६ जुन हा दिवस महाराष्ट्रातील ग्रामपंचायत,
पंचायत समिती व जिल्हा परिषद
कार्यालयामध्ये "शिवस्वराज्य दिन" म्हणुन
साजरा करण्या बाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा .
सामान्य प्रशासन विभाग ,
परिपत्रक क्र. साजिप/साप्रवि/परि-१/१८७-२२५ /२०२१ दिनांक १८/०१/२०२१

वाचले - महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग , यांचे कडील परिपत्रक क्रं.संकिर्ण-२०/
प्र.क्र. १००/आस्था-५ /बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१
दिनांक ०१ जानेवारी २०२१

**परिपत्रक**

रयतेचा हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठासही मन न दाखवने, अशी आज्ञा देणारा इतिहासातील पहिला राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज १७ व्या शतकात या महाराष्ट्रात भुमीपुत्रांचे हिंदवी स्वराज्य शिवाजी महाराजांनी स्थापन केले. परकीय आणि स्वकीय अशा जुलमी सत्ताधिशांशी वतनदारांशी अनेक लढाया, युध्दे या महाराष्ट्र भुमीत स्वराज्याची निर्मिती केली. जुलमी राजवटी संपुष्टात आणणेसाठी सर्व जाती - धर्माच्या अठरापगड बारा बलुतेदार, जिवाभावाचे मावळे एकत्र करुन हा लढा दिला. अनेक किल्ले सर केले. जनतेसाठी कसे राज्य करावे याचा आदर्श निर्माण केला आपल्या राज्यातील जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक वटहुकूम काढले. या महाराष्ट्रातील तमाम जाती धर्माचे लोक या स्वराज्याच्या कार्यात सामील झाले.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखील भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या लोकल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजे दि. ६ जून १६७४ म्हणजेच शिवराज्याभिषेक दिन होय. हे रयतेचे राज्य शाश्वत,चिरंतन रहावे म्हणून महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करुन घेतला. या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता व शिवाजी महाराज छत्रपती झाले होते. याच दिवशी स्वराज्याचे सार्वभौमत्व दुर्ग रायगडाच्या राजसदरेवरुन घोषित झाले. याच दिवशी श्री शिवराज्याभिषेक शकाची निर्मिती करुन महाराज शक कर्ते ही झाले. तो हा शुभदिन होय. महाराजांनी तत्कालीन प्रस्थापित सत्तांना पालथे करुन स्वतःच्या सार्वभौम स्वराजाचा पवित्र मंगलकलश जनतेला अर्पण करुन रयतेची झोळी सुख समृध्दीने भरली होती आणि याच पवित्र दिवशी शिवकालगणनेला प्रारंभ झाला होता. तो दिवस शिवस्वराज्य दिवस म्हणून साजरा करणेस शासनाने कळविले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः चा राज्याभिषेक करुन घेतलेला हा दिवस स्वराज्याची,सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. अशा या भूमी पुत्रांच्या स्वातंत्र दिनाचे महत्व आणखीन दृढ होण्यासाठी ६ जुन हा दिवस ०१ जानेवारी २०२१ पासुन ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद कार्यालयामध्ये "शिवस्वराज्य दिन" साजरा करुन या दिवशी आपले अधिनस्त तालुकास्तरावरील कार्यालय, सर्व ग्रामपंचायत, पंचायत समिती कार्यालयामध्ये सकाळी ११:०० वाजता सर्व पदाधिकारी अधिकारी / कर्मचारी यांनी गुढी उभारुन त्यास अभिवादन करावे व महाराष्ट्र गित आणि राष्ट्रगिताचे गायन करुन कार्यक्रम संपन्न करण्यात यावा. या बाबतच्या योग्य त्या सुचना निर्गमित करुन "शिवस्वराज्य दिन" साजरा करण्याची दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner

तसेच सातारा जिल्हा परिषद मुख्यालया मध्ये ६ जुन हा दिवस ०१ जानेवारी २०२१ पासुन दर व "शिवस्वराज्य दिन" म्हणुन साजरा करणेचे नियोजन कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (उत्तर )जिल्हा परिषद सातारा यांचेकडे या व्दारे सोपविण्यात येत आहे. तरी बांधकाम विभागाने योग्य ते नियोजन करुन शासन पत्रानुसार ६ जून हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याचे आयोजन करणेची नोंद घेवून दक्षता घ्यावी.

(विनय गौडा जीसी)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रत- १. मा.अध्यक्ष,सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा.उपाध्यक्ष सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

३. मा.सभापती विषय समिती ------------- सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

४. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांना माहिति व योग्य त्या कार्यवाहीसाठी .

५. सर्व खाते प्रमुख सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी .

६. सर्व गट विकास अधिकारी , पंचायत समिती , यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी .

७. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (उत्तर ) जि.प. सातारा यांना माहिति व कार्यवाहीसाठी.

८. उप अभियंता सातारा जि.प. बांधकाम उप विभाग सातारा यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

९. माहीती व तंत्रज्ञान विभाग जि.प. सातारा यांना जि.प. वेबसाईवर प्रसिध्द करणेसाठी.

Scanned with CamScanner